नि.दि.दावा क्र. ७८/२०१५
नानासाहेब व इतर वि. उध्दव व इतर
MHLA130005232015

निशाणी क्र.७९ खालील आदेशः–

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी त्यांचे विरुध्द झालेला दिनांक १५/०७/२०१६ व ०५/१२/२०१६ रोजी झालेला एकतर्फा आदेश रददबातल करण्याकरीता दाखल केला आहे. त्यावर, वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्या विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांना त्यांचा जबाब दावा वेळेत दाखल केला नाही. म्हणुन त्यांच्या विरुध्द जबाब दावा नाहीचा आदेश पारीत झाला. प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे १५/०७/२०१६ व ०५/१२/२०१६ रोजी प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्याविरुध्द पारीत करण्यात आलेले ''एकतर्फा आदेश रददबातल व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, मे. न्यायालयाना प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्या विरुध्द सन २०१६ मध्ये जबाब नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र. ५ ते ८ हे जाणुन–बुजून दाव्यास विलंब करीत आहेत. प्रतिवादी क्र. ५ ते ८ अर्जामध्ये कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केले नाही. सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

४. वादी यांनी प्रस्तुत दावा नि.दि.क्र. ६१३/२००४ चा हुकूमनामा त्यांच्या बंधनकारक नाही असे जाहीर होवनु मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचे महत्वाचे हक्क व हितसंबध गुंतलेले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनाही बचावावाची संधी देणे हे न्याय गरजेचे आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांना त्यांची बाजू मांडण्याची

संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

**१.** प्रतिवादी यांचा नि.क्रं.७९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** दिनांक १५/०७/२०१६ व ०५/१२/२०१६ रोजी प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्या विरुध्द पारीत करण्यात आलेले एकतर्फा आदेश आज रोजी प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांच्यावर रक्कम रु.१०००/– रुपये दंड बसवुन रददबातल करण्यात येतो.

**३.** प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी दंडाची रक्कम वादी यांना द्यावी.

सही/–

रेणापूर (के.के.वाघमारे)

दिनांकः– ४/०१/२०२४ सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., रेणापूर